# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. १०
# सभा क्र.१२, दिनांक ०६/०६/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. ०६/०६/२०२५ रोजी सकाळी ११.४० (अकरा वाजून चाळीस मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. नवल किशोर राम | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा.ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि) |
| मा.पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा.सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा.प्रशांत वाघमारे | – | शहर अभियंता |
| मा.सौ.उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. डॉ. निना बोराडे | – | आरोग्य प्रमुख |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकुमार जगताप | – | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभि.(भवन) |
| मा. सौ. मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा. प्रसाद काटकर | – | उपायुक्त (सा.प्र.) |
| मा.संदीप कदम | – | उप आयुक्त (घ.क.व्यव.) |
| मा.अविनाश सकपाळ | – | उप आयुक्त (क.आ.क.सं.) |
| मा. माधव जगताप | | उप आयुक्त |
| मा. राहुल जगताप | – | माहिती व तंत्रज्ञान प्रमुख |
| मा. सौ. किशोरी शिंदे | – | उप आयुक्त (भांडार) |
| मा. गणेश सोनुने | – | उप आयुक्त (परिमंडळ क्र. ३) |
| मा. नितीन केंजळे | – | मुख्य कामगार अधिकारी |
| मा. सुनंदा वाखारे | – | शिक्षणाधिकारी (माध्य.व तांत्रिक) |
| मा. सौ. उबाळे | – | प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ ) |
| मा. तांदळे | – | अधि.अभि. (मलनिःसारण ) |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.

नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे, सुरवातीला दाखल विषय घेण्यात येत आहेत.

## दाखल विषय

**विषय क्र.२०७त्वर्य**

१ मे २०२५ महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे महानगरपालिकेतील मा. अधिकारी व कर्मचारी वर्गाकरिता अल्पोपहार व चहापान व्यवस्था करणेकरिता मे. निशिगंधा हॉटेल, शिवाजीनगर, पुणे यांचेकडून काम करून घेण्यात आले असून त्याप्रीत्यर्थ त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्युल चप्टर ५ मधील कलम (१) (१) (ब) अन्वये करारनामा न करता खालील अर्थशिर्षकावर र.रु.१७,११५/- चे बिल खर्ची टाकून आदा करणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा. नगरसचिव यांचे आवक.क्र.मआ/८३२, दि.०४/०६/२०२५ चे पत्र.

अर्थशीर्षक<br>
१- मुख्यदेखरेख वसुली वगैरे<br>
क.मनपा नि स्थायी समिती<br>
१- नगरसचिव यांचे कार्यालय,<br>
वर्षातील महत्त्वपूर्ण दिन,<br>
कोड नं.RE11A275/R2-2<br>
सन २०२५-२६ मान्य तरतूद र.रु.६०००००/-

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०८त्वर्य**

श्री. कसबा गणपती मंदिर जतन व संवर्धन करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.R.R. DHOTRE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,७७,१२७/- पेक्षा ७.२१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून

र.रु.३१,३३,६३६=१४ अधिक जीएसटी र.रु.५,६४,०५५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३६,९७,६९१=१४ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/२२३; दि.०३/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०९त्वर्य**

पुणे पेठ एरंडवणा येथील गुळवणी महाराज रस्ता येथील कमिन्स इंडिया लि. कै. अप्पासाहेब गोडसे चौक ते रेस्कॉन कंपनी पर्यंत १२ मी. डीपी रस्त्यामधील ताब्यात न आलेल्या उर्वरित जागा ताब्यात घेणेकामी भूसंपदान कार्यवाही सुरु करणे व त्यासाठी आवश्यक रक्कम पथ विभागाकडून उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२२४, दि.०४/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२१०त्वर्य**

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नव्याने समविष्ट झालेल्या २३ गावांपैकी कोंढवे-धावडे, कोपरे, सुस म्हाळुंगे येथे ड्रेनेज लाईन दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. PAVAN SURESH JADHAV यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२,००,०२५/- पेक्षा २४.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,५०,४३८=७५ अधिक जीएसटी र.रु.५,६७,०७९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४३,२३६/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३७,६०,७५३=७५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/२२५, दि.०५/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२११त्वर्य**

प्रभाग क्र. २१ मधील ताडीवाला रोड, कोरेगाव पार्क परिसरामध्ये विविध ठिकाणी पाणी पुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. YOHAN CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९,६६,०४९/- पेक्षा १.५००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,२१,५५८=२७ अधिक जीएसटी र.रु.५,२५,८८०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३४,४७,४३८=२७ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक ( २६-०३-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१८,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२२७, दि.०५/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२१२त्वर्य**

लोकल पर्चेस योजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्यांकडून अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेकरीता दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्य २४ महिन्याकरिता खरेदी करणे कामी निविदा मागविली असता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात या निविदेतील पात्र निविदाधारक मे. श्रीराम डिस्ट्रीब्यूटर्स यांचेकडून जेनेरिक औषधे व इतर साहित्य आणि ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्य रक्कम रूपये ९,५०,००,०००/- पर्यंत खरेदी करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशीर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२२८, दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

अर्थशीर्षक सन २०२५-२६

"RE17F133A"

"औषधे खरेदी (बल्क पद्धतीने मनपा सभासदांसाठी मनपा सेवकांसाठी, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनासाठी इत्यादी)"

मान्य तरतूद रक्कम रुपये ४०,००,००,०००/- पैकी ९,५०,००,०००/-

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२१३त्वर्य**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेले ११ गावे व २३ गावांपैकी पर्वती जलकेंद्र अंतर्गत येणाऱ्या बुस्टर पंपिंग यंत्रणा ३ वर्षाकरीता चालविणेसाठी सेवक पुरविणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE SWAMI GOVINDA CONSTRUCION 7 यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१२,६७,८५,४१०/- पेक्षा ०.७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१२,५८,९७,९१२=१३ अधिक अधिक जीएसटी र.रु.२२६६१६२४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१४,८५,५९,५३६=१३ तसेच (०१-०५-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या लॉक केलेली र.रु.१,००,००,०००/-) पर्यंत काम करणेस तसेच कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दरातील मे. शासनाकडून वेळोवेळी मान्य करण्यात येणाऱ्या कमी/अधिक दरवाढीनुसार होणाऱ्या उपलब्ध रकमेपर्यंत, काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२२९, दि.०५/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

## कार्यपत्रिकेवरील विषय

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र.१७९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील ढोले-पाटील, येरवडा कळस धानोरी, व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/२०९, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.२ कार्यालयाचे नियंत्रणाखालील औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड, व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/२१०, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र.१८१**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.४, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२५ ते दि.१५/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.४/१६१, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८२**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/२१२, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८३**

दिनांक २१/०४/२०२५ ते दिनांक २७/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण १०० आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२११, दि.३०/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८४**

दिनांक १४/०४/२०२५ ते दिनांक २०/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ८९ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२१३, दि.३०/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८५**

दिनांक २८/०४/२०२५ ते दिनांक ०४/०५/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण १०६ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२१४, दि.३०/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.३/२१५, दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/२१६, दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१८८**

दिनांक ०५/०५/२०२५ ते दिनांक ११/०५/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ६७ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२१७, दि.०२/०६/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**सेवकवर्ग कडील प्रकरणे**

**विषय क्र.१८९**

आरोग्य कार्यालय अंतर्गत कीटक प्रतिबंधक विभागाकडे कामास असलेले सेवक श्री.शिवाजी रंगप्पा तुम्माले, हुद्दा- बिगारी यांच्या निलंबन कालावधीची पहिली सहामाही दि.०२/१०/२०२२ ते ०१/०४/२०२३, दुसरी सहामाही दि.०२/०४/२०२३ ते दि.०१/१०/२०२३, तिसरी सहामाही दि.०२/१०/२०२३ ते दि.०१/०४/२०२४, चौथी सहामाही दि.०२/०४/२०२४ ते दि.०१/१०/२०२४ रोजी पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/साप्र/२०८, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१९०**

हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाकडे कामास असलेली सेविका श्रीमती चंद्रभागा लाला म्हस्के, हुद्दा- बिगारी यांच्या निलंबन कालावधीची नववी सहामाही दि.०७/१०/२०२४ ते ०६/०४/२०२५, रोजी पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/साप्र/२२०, दि.०३/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र.१९१**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये परिमंडळ क्र.४ अंतर्गत महमंदवाडी स्मशानभूमी येथे पर्यावरणपूरक गॅस दाहिनी पुरविणे, बसविणे व चालू करून देणे व तदनुषंगिक कामे करणे (मनपा/शासकीय/निमशासकीय रजिस्ट्रेशन अटशिथिल) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Vichare And Company Private Limited यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०,८३,२६८/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १.७०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,९६,८५२=४४ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.८,९९,४३३/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५८,९६,२८५=४४ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (०४-०४-२०२५) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२०१, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – याचे काय आहे?

मा. श्रीमती शेकटकर, मुख्य अभि.(विद्युत)– त्या ठिकाणी पोल्यूशन जास्त होत होते म्हणून त्या ठिकाणी आपण गॅस दाहिनी बसवतो आहे.

मा. प्रशासक – काम बरोबर झाले आहे की नाही, त्याचा दर्जा कसा आहे हे आपण पाहिले आहे का?

मा. श्रीमती शेकटकर, मुख्य अभि.(विद्युत)– हो, आपण ते चेक करतो.

मा. प्रशासक – यामध्ये करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मागितली आहे. करारनामा करणेस मान्यता घ्या आणि 'बिल अदा करणेस ' याचा उल्लेख केलेला आहे ते काढून टाका आणि त्यानंतर हे मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९२**

वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत येणाऱ्या नाल्याची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N.CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,९९,७११/- पेक्षा ५०.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,१९,९३८=३९ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३९,१९,९३८=३९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०७-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/२०२, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३**

ढोले पाटील हस्तांतरण केंद्र, कोरेगाव पार्क येथील स्थापत्य दुरुस्ती विषयक उर्वरित कामकाज कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. URBAN SPACE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,९९,२५७/- पेक्षा २७.३३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,४१,०२०=०६ अधिक जीएसटी र.रु.८,८९,३८४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२२,१३५/- पर्यंत अधिक सल्लागार शुल्क र.रु.६७,९९२/- अशी एकूण र.रु.५९,२०,५३१=०६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२०३, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४**

हडपसर कचरा हस्तांतरण केंद्र, येथे देखभाल दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. URBAN SPACE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,६८,३१२/- पेक्षा २४.३३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,०७,९७१=६९ अधिक जीएसटी र.रु.११,४२,०१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२२,१३५/- पर्यंत अशी एकूण र.रु.७५,७२,१२१=६९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२०४, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५**

हडपसर कचरा हस्तांतरण केंद्र, येथील स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PAVAN BHIMRAO LAKHE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,६८,३०९/- पेक्षा २७.४७०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,४२,०६४=५२ अधिक जीएसटी र.रु.१०,९४,६२५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२२,१३५/- पर्यंत अशी एकूण र.रु.७२,५८,८२४=५२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा

करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२१९, दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९६**

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय्य योजने अंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्य २४ महिन्याकरिता खरेदी करणे कामी निविदा मागविली असता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात या निविदेतील पात्र निविदाधारक मे. गायत्री मेडिकल्म डिस्ट्रीब्यूटर्स यांचेकडून बॅन्डेड औषधे व इतर साहित्य व मे. न्यू नरेंद्र मेडिकल्स यांचेकडून जेनेरिक औषधे व इतर साहित्य रक्कम रूपये ८,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये आठ कोटी फक्त) पर्यंत आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय्य योजने अंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्य २४ महिन्याकरिता खरेदी करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशीर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२१८, दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२५-२६

"RE17F133A"

"औषधे खरेदी (बल्क पद्धतीने मनपा सभासदांसाठी मनपा सेवकांसाठी, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनासाठी इत्यादी)"

मान्य तरतूद रक्कम रुपये ४०,००,००,०००/- पैकी ८,००,००,०००/-

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९७**

शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत तानाजीवाडी एसटीपीकडे येणाऱ्या मुख्य मलवहिनींची देखभाल व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Aakash construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,२८,०३६/- पेक्षा १५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३,७८,८३०=६ अधिक जीएसटी र.रु.९,६८,१९०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३२,२११/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६३,७९,२३१=६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२२१, दि.०३/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९८**

शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत तोफखाना पंपिंग स्टेशनकडे येणाऱ्या मुख्य मलवहिनींची देखभाल व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Aakash construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,२८,०३६/- पेक्षा १५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३,७८,८३०=६ अधिक जीएसटी र.रु.९,६८,१९०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३२,२११/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६३,७९,२३१=६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२२२, दि.०३/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**विषय क्र.१९९**

समान पाणीपुरवठा प्रकल्प पॅकेज ४ अंतर्गत येणाऱ्या टाक्यांकरिता सीमाभिंत / रीटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. J P Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७,६६,९४,०९०/- पेक्षा २२.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,९४,३७,९१९=७५ अधिक जीएसटी र.रु.१,०६,९८,८२६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२,७७,५१५=७१ पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,५९,३९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७,१६,७३,६५१=७५ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१००००००००) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/६०; दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२००**

बिबवेवाडी स.क्र. ६२२ व ६२४ येथील पाण्याच्या टाकीमागील अस्तित्वातील सीमाभिंत व घर पाडून त्याठिकाणी नव्याने Retaining Wall, Compound Wall, घर बांधणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. B P Khodade And Company यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४,४५,१६,७४४/- पेक्षा २६.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,२८,९७,८७३=८२ अधिक जीएसटी र.रु.५९,२१,६१७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.७,११,४२२=४४ पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.६०,३५०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३,९५,९१,२६२=८२ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२७५०००००) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१०९; दि.१४/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१**

प्राथमिक शिक्षण विभागाकडील असणाऱ्या शाळेलगत इयत्ता ८वी, ९वी, व १०वी चे वर्ग व ज्युनिअर कॉलेज सुरु करणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक/१५९, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.२०२**

१५ व्या वित्त आयोगाअंतर्गत कोथरूड डेपो ते कचरा ramp (पौड रस्ता) दरम्यान फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. SUNRAJ CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२२,५१,६११/- पेक्षा २४.६२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२,३५,२६४=३७ अधिक जी.एस.टी. र.रु.१६,६२,३४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.५,०८,४५५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३४,१६०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,१४,४०,२२७=३७ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१८२, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.२०३**

प्रभाग क्र.२६ एन.आय.बी.एम. रोड ऑर्चिड पलेस येथील २४ मी. रुंदीचा डीपी रस्ता विकसित करणे व चढ कमी करणे या कामास आवश्यक खर्चाचे उत्तरदायित्व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये स्वीकारण्यास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१८९, दि.२९/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०४**

पुणे मनपाची कोंढवा बु|| येथील इस्कॉन मंदिराजवळील स.नं. ५६/८अ/२५अ/९अ व स.नं. ५०/२/२/७ येथील ॲमेनिटी स्पेस च्या जागा अन्नामृत फाउंडेशन या संस्थेस शालेय पोषण आहार तयार करणे कामी किचन शेड (Mega Centralised Kitchen) उभारणे कामी पुणे महानगरपालिका व अन्नामृत फाउंडेशन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ३० वर्षे मुदतीकरीता किचन शेडसाठी जगा देणेबाबत खालील अटींवर मा. भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती व ॲमेनिटी स्पेस कमिटीची पश्चात मान्यता मिळेल या अटीवर मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राथमिक/१९१, दि.२९/०५/२०२५ चे पत्र.

१. सदर संस्थेचे आवश्यक ते दस्तऐवज तपासून संस्थेची निवड करणेची जबाबदारी या विभागाची राहील.
२. सदर संस्थेच्या सेवेबाबत अटी शर्ती ठरविणेची जबाबदारी शिक्षण विभागाची राहील.
३. सदर पात्र संस्थेशी करारनामा करणे व त्यानुसार संस्थेच्या कामकाजावर शिक्षण विभागाने नियंत्रण ठेवावयाचे आहे.
४. सदर जागेची मालकी/ताबा पुणे महानगरपालिकेचाच राहील. फक्त संस्थेच्या मागणीनुसार ३० वर्षाकरीता शालेय पोषण आहार योजनेकरीता करता येईल, अन्य प्रयोजनार्थ जागेचा वापर करता येणार नाही. (Mega Centralised Kitchen या वापरासाठीच करता येईल.)

५. सदर प्रकल्प पुणे महानगरपालिका, शिक्षण विभाग व अन्नामृत फाउंडेशन (इस्कॉन फुड रिलीफ फाउंडेशन) यांच्या सयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असल्याने महानगरपलिकेकडून जागा उपलब्ध करून दिल्यानंतर पुढील सर्व व्यवस्था संस्थेने करावयाची आहे.
६. भविष्यात महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासल्यास विनाअट विनाविलंब महानगरपालिकेस परत करणार.
७. सदर जागा इतर संस्था/व्यक्ती यांना हस्तांतर किंवा पोट भाडयाने देता येणार नाही.

मा. प्रशासक – हा काय विषय आहे? माहिती द्या.

मा. वाघमारे, शहर अभियंता – यामध्ये ॲमिनिटी कमिटी असते, मा. महापालिका आयुक्त त्या कमिटीचे अध्यक्ष असतात. ज्या ठिकाणी गरज आहे अशाच ठिकाणच्या ॲमिनिटी स्पेस दिल्या जातात त्यासाठी ॲमिनिटी कमिटीमध्ये आपण मान्यता देत असतो. आता या दोन जागेपैकी एका जागेवर पोलिस स्टेशनचे रिझर्व्हेशन आहे त्यामुळे या दोन्हींपैकी एकच जागा म्हणजे ६८५ चौ. मीटर ही जागा त्यांना देता येईल.

मा. प्रशासक – या जागेसाठी आपल्याला ते पैसे देणार की फ्री ऑफ कॉस्ट द्यायची आहे?

मा. दिवटे, अति.महा.आयुक्त (वि)– पुणे महानगरपालिका आणि ती संस्था असे आपण दोघे संयुक्त विद्यमाने हे करणार आहोत.

मा. श्रीमती वाखारे, शिक्षण मंडळ – त्या संस्थेला शासनाकडून अन्नधान्य पुरवठा होत आहे.

मा. प्रशासक – त्या ठिकाणी त्या जागेचा वापर कमर्शिअल होणार नाही असा त्यामध्ये उल्लेख करा आणि जर असा वापर होताना दिसला तर तो करार रद्द करण्यात येईल असे त्यामध्ये नमूद करा आणि या दोन्ही जागेपैकी ६८५ चौ.मीटर ही जागा त्यांना द्या.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०५**

पुणे महानगरपालिका हद्दीत वाहतूक नियोजनासाठी ट्राफिक वॉर्डन नेमणूकीबाबत शहरातील वाहतुकीचे दैनंदिन नियंत्रणाकरिता सदरचे तातडीचे काम झाले असल्याने सदर प्रकरणी पूर्व संदर्भातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये र.रु. ८९,८०,६१२.५०/- मान्य झालेले आहेत. तरी वाढीव र.रु.२,९२,२७,३७९=७३ याचे देयक ठेकेदार मे. ओम साई सर्व्हिसेस यांना अदा करणेकरिता मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१९२, दि.२९/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०६**

संविधान अमृत महोत्सवाअंतर्गत संविधानाचे उद्देशपत्रिका चाररंगी (फोर कलर) छपाई व एक बाजू लमिनेशनसह करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) नुसार १५ लाख प्रती या ठेकेदार मे. कृपा एन्टरप्रायजेस यांचेकडून खरेदी करण्यात आले असून त्या प्रीत्यर्थ र.रु.३५२५०००/- त्यांना अदा करण्यात आलेले बिल हि बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुद्रणालय/२०७, दि.३०/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /– xxx**
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. १७/०६/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**